कोर्ट

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

राज्य State: महाराष्ट्र — जिल्हा District: मुंबई शहर — पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. — पहिली खबर क्र. FIR No.: २७ — वर्ष Year: २०२६ — दिनांक Date: २४/०९/२०२६

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८ — कलमे Sections: ७

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from: २२/०९/२०२६ — वेळ Time: ११:०० — तारीख पर्यंत Date to: २४/०९/२०२६ — वेळ Time: १५:५५

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००

(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. — तारीख Date: २२/०९/२०२६ — वेळ Time: ११:०० वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ३४/२०२६ — तारीख Date: २४/०९/२०२६ — वेळ Time: २३:३०

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: माहिम वाहतूक पोलीस चौकी, माहिम चर्चच्या समोर, एल.जे. रोड, माहिम, मुंबई. — ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist.: मुंबई — राज्य State: महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: रजनी उंबरकर — (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: बबन उंबरकर

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४० वर्षे — (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय — फोन नं. Phone No.: ९८५००८४१८५

(e) पारपत्र क्रमांक Passport No.: — — दिल्याचा दिनांक Date of issue: — — दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation: नोकरी

(g) धर्म Religion: हिंदु — जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address: ९४७, पहिला मजला, बि.नं.८, पोलीस अधिकारी निवासस्थान, डी.एन.नगर पोलीस ठाणे कंपाऊंड, अंधेरी (प), मुंबई ४०००५८. — गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वाटसे नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

येसुदास दुरईस्वामी हरिजन उर्फ अण्णा, वय ४० वर्षे, पद- हेल्पर, VSS Multiventures Pvt Ltd. माहिम वाहतूक पोलीस विभाग, रा.ठि.- रुम नं ७९, कमलानगर, जास्मिन मिल रोड, धारावी, मुंबई ४०००१७.

दिनांक :- २४/०९/२०

जबाब

फिर्यादी नामे श्रीमती रजनी बबन उंबरकर, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी (पोलीस निरीक्षक) यांचा जबाब स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(उमा गवळी)
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्याद                                    दिनांक २४/०९/२०२६

मी, रजनी बबन उंबरकर, वय ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. मोबाईल क्रमांक ९८५००८४९८५.

मी, वरील प्रमाणे असून, माहे सप्टेंबर २०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नेमणुकीस आहे.

मी, दिनांक २२/०९/२०२६ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात सकाळी ०९.४५ वा. दरम्यान कर्तव्यावर हजर झाले. मा. वरिष्ठांनी मला तसेच स.पो.आ. श्री. प्रविण पावले असे दोघांना त्यांच्या कार्यालयात बोलावून ला.प्र.वि. कार्यालयात लोकसेवकाच्या विरोधात तक्रार देण्याकरीता आलेले राशिद अकबरअली खान यांची ओळख करून देवून त्यांची सविस्तर तक्रार ऐकून सापळा अधिकारी म्हणून मला पुढील योग्य ती कारवाई करण्याचे आदेशित केले. तसेच स.पो.आ. प्रविण पावले यांना पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नियूक्त केले. त्यानंतर मी व सपोआ पावले तक्रारदार राशिद खान यांना माझे कक्षात घेवून आलो.

मी आणि सपोआ पावले यांनी तक्रारदार राशिद खान यांच्याकडे त्यांच्या तक्रारीबाबत विचारणा केली असता, त्यांनी माहिती दिली की, त्यांचे पुर्ण नाव राशिद अकबरअली खान, वय २८ वर्षे, व्यवसाय - कामगार पत्ता - आयशा कॉटेज, बिल्डींग नं. ३, पाईप रोड, कुर्ला पश्चिम, मुंबई ४०००७० असे आहे. तक्रारदार हे जमालुददीन शेख यांच्या सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई येथे वडापाव तथा भाजी विक्रीच्या धंदयावर काम करतात. त्याचे मालक जमालुददीन शेख यांचा माहिम पश्चिम येथेही वडापाव विक्रीचा धंदा असून तक्रारदाराला त्याचे मालक जमालुददीन शेख यांनी व्यवसायानिमित्त युनीकॉर्न मोटर सायकल क्रमांक एम-एच-०३-बीजी-५२४४ ही दिलेली आहे. तक्रारदार व्यवसायाचे कामासाठी नमूद मोटर सायकलचा नेहमी वापर करतात.

दि.२१/०९/२०२६ रोजी सायंकाळी तक्रारदाराने ते वापरत असलेली मोटार सायकल क्र. एम-एच-०३-बीजी-५२४४ ही माहीम पश्चिम रेल्वे स्थानक चे बाहेर फुटपाथ लगत पार्क केली असता नमूद मोटर सायकल माहिम वाहतूक पोलीस विभागाकडून नो पार्कींग मध्ये मोटर सायकल उभे केल्याने टोईंग करून माहिम वाहतुक पोलीस चौकी येथे नेली. त्यानंतर तक्रारदाराने त्याबाबत मालक जमालुददीन शेख यास मोटर सायकल टोईंग करून नेल्याचे सांगितले. त्यानंतर त्याचे मालक व तक्रारदार असे दोघेही चौकीमध्ये जावून ट्रॅफिक पोलीस माने साहेब यांना भेटले व टोविंग केलेल्या मोटार सायकल क्रमांक एम एच-०३ बीजी-५२४४ बाबत विचारणा केली असता माने साहेब यांनी नो पार्कींग व पूर्वीचा फाईन असे मिळुन ९०००/- रुपये फाईन भरावा लागेल असे तक्रारदार व त्याचे मालकाला सांगितले. तेव्हा तक्रारदार यांच्या मालकांनी माने साहेबांना पूर्वी मारलेला फाईन नंतर भरतो, आताचा नो पार्कींग चा फाईन घेवून गाडी सोडण्याची विनंती केली असता त्यांनी पुर्ण फाईन भरल्याशिवाय गाडी सोडता येणार नाही असे सांगितले. यावर तक्रारदार व त्यांचे मालक यांनी माने साहेबांना पुन्हा विनंती केली असता त्यांनी ४,०००/- रुपये दयावे लागतील व पावती मिळणार नाही असे सांगून टोविंग व्हॅनसंबंधित काम पाहणारे अण्णा नावाचे इसमा सोबत बोलणे करण्यास सांगितले. तक्रारदार हे टोविंग व्हॅनचे काम पाहणारे अण्णा यास भेटले. त्यावेळी अण्णा याने देखील तक्रारदार व त्याचे मालक जमालुददीन शेख यांना माने साहेबांनी सांगितलेप्रमाणे पैसे देवून गाडी घेवून जाण्यास सांगितले.

तक्रारदार राशिद अकबरअली खान यांनी पोलीस माने साहेब व टोविंग व्हॅन चे काम पाहणारा खाजगी इसम अण्णा यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्याकरिता तक्रारदार हे दिनांक २२.०९.२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे मालक जमालुददीन शेख यांचेसोबत आले. अशी हकीकत तक्रारदाराने सांगितल्याने त्यावेळी मी आणि सपोआ पावले यांनी तक्रारदार राशिद अकबरअली खान यांना त्यांची तक्रार त्यांच्या स्वत:च्या हस्ताक्षरात लिहीण्यास सांगितली. परंतु तक्रारदार यांचे आठवी इयत्तेपर्यंत हिंदीमध्ये शिक्षण झाले असून त्यांना लिहीण्याचा सराव नसल्याने त्यांनी तक्रार हिंदीमध्ये सांगितली, त्याप्रमाणे मी, त्यांची तक्रार हिंदीमध्ये संगणकावर टंकलिखित केली. त्याप्रमाणे त्यांना मालक जमालुददीन शेख यांचे समक्ष वाचून दाखविली व तक्रार बरोबर असल्याची त्यांनी खात्री करून स्वाक्षरी केली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तात्काळ पडताळणी कारवाई करण्याकरीता प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांना दोन शासकीय पंच बोलाविण्यास सांगितले. त्याप्रमाणे दोन शासकीय पंच नामे १) श्री. प्रणेश संभाजी शिंदे, वय ३५ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - सहाय्यक सहकारी अधिकारी, कार्यालयीन पत्ता - उप निबंधक, सहकारी संस्था, आर उत्तर विभाग, बी एम सी गोडाऊन बिल्डींग, रुम नं. ३०३, ९० फिट

रोड, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबई ४००१०१, तसेच २) श्री. जीवन महादेव गवई, वय ४२ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - कनिष्ठ लिपीक, कार्यालयीन पत्ता - महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा पूर्व, मुंबई ४०००५१, असे दोन पंच माझे कक्षात आले. त्यावेळी मी दोन्ही पंचांना तक्रारदार राशिद यांची प्रथम ओळख करून दिली आणि त्यांच्या तक्रारीची थोडक्यात हकिगत सांगितली. तसेच दोन्ही पंचांना तक्रारदार यांचा हिंदीमध्ये संगणकावर टंकलिखीत केलेला अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सपोआ प्रविण पावले तसेच दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पडताळणी क्र. ६६/२०२६, दि. २२/०९/२०२६ प्रमाणे नोंद घेवून पुढील कारवाई चालू केली.

त्यानंतर, लोकसेवक माने हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने अवलंबविण्यात येणारी सर्व प्रक्रीया मी व सपोआ प्रविण पावले यांनी दोन्ही पंच तसेच तक्रारदार यांना समजावुन सांगितली. त्यानंतर मी, सपोआ पावले, दोन्ही पंच व तक्रारदार राशिद खान असे आम्ही गोपनीय कक्षात गेलो तेथे तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये मोबाईल फोनद्वारे किंवा समक्ष होणारे संभाषण कशाप्रकारे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येईल याची माहिती दोन्ही पंच व तक्रारदार यांना दिली. त्यानंतर तांत्रिक शाखेचे पो.शि. मिंडे यांचे मदतीने डि.व्ही.आर मधील नवीन कोऱ्या एस.डी. कार्डमध्ये मी, तक्रारदार व पंच असे आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांची कारवाई मध्ये भाग घेणाऱ्या पोलीस पथकाची ओळख करून दिली व सर्वांना पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर दिनांक २२/०९/२०२६ रोजी १५:०० वा. मी, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे पथक लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक कार्यरत असलेल्या माहिम ट्रॅफिक पोलीस चौकी या कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी, दिलेल्या आदेशाप्रमाणे दुसरे शासकीय वाहन हे किर्ती कॉलेज, दादर, मुंबई परिसरात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबवण्यात आले. तसेच पहिले शासकीय वाहन हे लोकसेवक कार्यरत असलेल्या माहिम ट्रॅफिंक पोलीस चौकीपासून काही अंतरावर माहिम युनियन हाऊस सोसायटीच्या समोरील बाजूस कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबवण्यात आले. त्यावेळी १५.५५ वाजले होते.

माझे सांगण्याप्रमाणे तांत्रिक शाखेचे पो. शि. मिंडे यांनी ठिक १६:१४ वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०१, श्री. शिंदे हे लोकसेवक यांना भेटण्यासाठी ते कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. पंच क्र. ०२ गवई व उर्वरीत पथक शासकीय वाहनाजवळच थांबून राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार राशिद खान व पंच श्री. शिंदे हे शासकीय वाहनाजवळ परत आले. त्यावेळी माझे सांगण्याप्रमाणे पो.शि. मिंडे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून माझे ताब्यात दिला. त्यावेळी १६:५१ वाजले होते.

त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी तक्रारदार राशिद खान यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ते लोकसेवक यांना भेटण्याकरीता माहिम ट्रॅफिक चौकी येथे गेले व लोकसेवक पोलीस श्री माने कुठे आहेत, याबाबत विचारणा केली असता तेथे माने नावाचे कोणीही नसल्याचे समजले. त्याचवेळी तक्रारदार यांना ट्राफिक टोविंग व्हॅनचे काम पाहणारा अण्णा हा त्या ठिकाणी दिसला. तक्रारदार हे त्याचेशी बोलायला जाणार त्याचवेळी तक्रारदार यांचे मालक जमालुद्दीन शेख हे त्या ठिकाणी आले व ते देखील तक्रारदार व पंचांसोबत अण्णा याचेजवळ गेले. तेव्हा अण्णा तक्रारदार व मालक जमाल यास बोलले की, ''इन्श्युरन्स रहता तो, मै एकही फाईन भरके लेते, इन्शुरन्स का चार हजार रूपया होता ना, आपको कल ही बोला मैं, फाईन के साथ में, जी, पिछला फाईन तो छे आठसौ है, पहिले का फाईन छोडता हूँ, पहिले का फाईन छोडता हूँ, क्या मदत करने का बोलो ना, है ना मैं इधर खडा है ना, अभी कितना भरोगे, बोलो तो सही, में उनको बोलूगां ना, तुम्हारा मुँह देखकर कल में कितना बोला, क्या बोल रहे है, दो हजार मै कम करता हूँ,'' तेव्हा तक्रारदार यांचे मालक जमालुद्दीन शेख यांनी माने साहेबांना भेटायला आलो असल्याचे सांगून त्यांना भेटण्यास जात असल्याचे सांगितले. ते साहेब कुठे आहेत

याबाबत विचारणा केली असता ते पलीकडे चौकात डयुटीवर असल्याचे सांगितले, त्यानुसार तक्रारदार, पंच क्र. १ व जमालुद्दीन असे लोकसेवक यांना भेटण्यासाठी गेले असता, तेथे त्यांना लोकसेवक ट्राफिक पोलीस भेटले ज्यांनी त्यांची दि. २१/०९/२०२६ रोजी मोटार सायकल टोईंग करून नेली होती, त्यांचेशी बोलणे केले असता त्यांचे नाव माने नसून माळी असल्याचे समजले. त्यांचेशी तक्रारदार व त्यांचे मालक जमालुद्दीन यांनी '' नमस्ते साब, गाडी के लिये आया था '' असे बोलून त्यांची मोटार सायकल सोडण्याबाबत बोलणे केले असता लोकसेवक माळी यांनी '' माझं म्हणण ऐका, मी एकदा फाईन मारून गाडी ताब्यात दिली ना त्यांच्या परत त्यांचे काय ऐकू, माझे सबंध नाही तोपर्यंत, जोपर्यंत माझी डयूटी जागेवर गाडी फाईन मारून दिली ताब्यात, जर फाईन मारून ते सिवारच्या ताब्यात दिलं, सिवार म्हणतातं त्याला, सिवार च्या ताब्यात दिली की माझा सबंध संपला आणि काल मी एक दिवस टोईगं व्हॅन वर होतो आज मी नाही, ती त्यांच्या ताब्यात दिली होती त्याची फाईन भरा नाही भरा, साहेबांना भेटा काहीही करा, मी नो पार्किगं मधून उचलून आणली. मला काय त्या गाडीची नातेवाईक हाय काय, माणूसकीच्या नाताने गाडी मी नो पार्किगं मधून उचलून आणलीयें,' अशी माहिती तक्रारदार यांनी सांगितली.

त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी पंच क्र. १ श्री. शिंदे यांना लोकसेवकाच्या भेटीबाबत विचारणा केली असता, पंच क्र. १ श्री. शिंदे यांनी तक्रारदार यांनी सांगितलेल्या हकिकतीप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली.

त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी दोन्ही पंचांच्या समक्ष डिव्हीआर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, नमुद संभाषणामध्ये तक्रारदार, टोविंग व्हॅनचे काम पाहणारा इसम अण्णा व लोकसेवक यांचे संभाषण झाले असल्याचे समजून आले. नमूद संभाषणावरून लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे स्पष्टपणे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले नाही. परंतु टोविंग करून ट्रॅफीक चौकीला आणलेली वाहने सोडण्याचे काम करणारा इसम अण्णा याने तक्रारदाराशी कामानिमित्त बोलणे केले असल्याने व तक्रारदाराची मोटर सायकल त्यांचे ताब्यात असल्याने उदईक रोजी पुन्हा एकदा पडताळणी कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार दि. २२/०९/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दि. २३/०९/२०२६ रोजी पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करण्यात आले. तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र. ०१ शिंदे यांच्यासह टोईंग केलेली वाहने सोडण्याचे काम पाहणारा अण्णा यांना भेटण्यासाठी माहिम ट्रॅफिक पोलीस चौकीला रवाना केले. काहीवेळाने तक्रारदार हे पंच क्र१ शिंदे यांचेसोबत शासकीय वाहनाजवळ परत आले असता, तक्रारदार यांना लोकसेवक यांचेसोबत कार्यालयात झालेल्या भेटीबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की ''ते पंच क्र. १ श्री. शिंदे यांचेसोबत चालत लोकसेवक यांचे कार्यालयात माहिम ट्रॅफिक पोलीस चौकी येथे गेले असता, त्याठिकाणी हजर असलेला इसम अण्णा याने त्यांना ' क्या हुआ ' असे विचारले असता त्यांनी त्यास 'गाडी छुडाना के था' असे सांगितले त्यावर टोविंग व्हॅनचे काम करणारा इसम अण्णा याने तक्रारदार यांना '' साहब ने बोला ना तेंरे को, तेंरे को पेहेले हि बोला हू, साहब के पास जा मत करके, बार बार साहब के पास जा रेहे हो तुम लोग उधर, हा, कितना बोला तेंरे को, तीन हजार रुपये बोले थे ना, छे हजार फाईन जा रहा है, तीन हजार भर दे, अगर तुझे पावती चाहिये तो छे हजार तीनसो छत्तीस का पावती मिलेगा तेंरे को, कभी तक आयेगा बोल'' .याप्रमाणे तक्रारदार खान यांनी हकीगत सांगितली.

त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी दोन्ही पंचांच्या समक्ष डिव्हीआर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, नमुद संभाषणामध्ये तक्रारदार व टोविंग व्हॅनचे काम करणारा इसम अण्णा यांचे संभाषण झाले असून टोविंग व्हॅनचे काम करणारा इसम अण्णा यांनी तक्रारदार यांची टोईंग केलेली मोटार सायकल विनापावती सोडण्यासाठी रू. ३०००/- रक्कमेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाले. परंतू टोविंग व्हॅनचे काम करणारा इसम नामे अण्णा ही व्यक्ती लोकसेवक आहे किंवा कसे? तसेच लाचेची रक्कम कोणाचे वतीने स्विकारत आहे? याबाबत खात्री करणे आवश्यक असल्याने ला.प्र.वि. कार्यालयातील वरिष्ठांशी चर्चा करून उदईक रोजी पुढील कारवाई करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार दि. २३/०९/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दि. २३/०९/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केलेला इसम अण्णा हे लोकसेवक असल्याची खात्री आज दि.२४/०९/२०२६ रोजी झाल्याने सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले. मी व सपोआ पावले यांनी पंच व तक्रारदार तसेच सापळा पथकास पुढील सापळापूर्व/सापळा कारवाईच्या

अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी, तक्रारदार राशिद खान यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रुपये ३,०००/- इतकी रक्कम त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. तक्रारदार राशिद खान यांचेकडील रू. ३,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ६ नोटा) यांची पंचासमक्ष एका कागदावर झेरॉक्स काढण्यात आली. त्यावर मी व दोन्ही पंचांनी सहया केल्यानंतर तो कागद माझे ताब्यात घेतला.

त्यानंतर मी, सांगितलेवरून पो.ह. कावले यांनी दोन्ही पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पो.ह. कावले यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रुपये ३,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ६ नोटा) रक्कमेच्या नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार राशिद खान यांनी परिधान केलेल्या शर्टच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी, पो.ह. कावले हे सापळा कारवाईमध्ये प्रत्यक्ष भाग घेणार नसल्याचे पंचांना सांगितले. तदनंतर मी, लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांना स्वत:चे डोक्याचे केसांवरून हात फिरवून सापळा पथकाला दिसेल अशाप्रकारे लाच स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत तक्रारदार यांना सांगितले.

त्यानंतर मी, स.पो.आ पावले, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदार असे पथक लाप्रवि कार्यालयातून सापळा कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक काम करत असलेल्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी, दिलेल्या आदेशाप्रमाणे दोन्ही शासकीय वाहने लोकसेवक काम करत असलेल्या माहिम ट्रॅफिक पोलीस चौकीपासून काही अंतरावर रोनाल्ड मॅकडोनाल्ड हाऊसच्या समोरील बाजूस थांबली. त्यावेळी १५.१५ वाजते होते. त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी पंच, तक्रारदार व पथकातील स्टाफला कारवाईच्या अनुषंगाने योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या.

त्यानंतर माझे सांगणेप्रमाणे पो.ह.गायकवाड यांच्या मदतीने तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या रक्कमेसह पंच क्र. ०१ श्री शिंदे यांचे सोबत लोकसेवक यांचे कार्यालय माहिम ट्रॅफिक पोलीस चौकी येथे पाठविले. त्या दरम्यान पंच क्र. ०२ व सापळा पथक हे लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या बाहेरील परिसरात कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले.

काही वेळाने तक्रारदार राशिद खान यांनी डोक्याचे केसांवरून हात फिरवून लोकसेवक यांनी लाच स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर लगेच मी व सोबत असलेल्या सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच लोकसेवक अण्णा यास ताब्यात घेतले. त्यावेळी १५.५५ वाजले होते. सापळा पथकातील स.फौ. तेली यांनी लोकसेवक अण्णा यांचा डावा हात व पो.ह. झांझुर्णे यांनी उजवा हात पकडून लोकसेवक यांना अटकावून ठेवले. त्यानंतर पो.ह. गायकवाड यांचे मदतीने तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून मी माझे ताब्यात ठेवला. आरोपी लोकसेवक अण्णा यांस मी व सपोआ पावले यांनी स्वत:ची ओळख सांगितली. त्यानंतर आरोपी लोकसेवक अण्णा यास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे नाव येमुदास दुराईस्वामी हरिजन ऊर्फ अण्णा, वय ४० वर्षे, धंदा - हेल्पर, VSS Multiventures Pvt Ltd, रा.ठि. रुम नं. ७९, न्यू कमला नगर, जास्मिन मिल रोड, धारावी, मुंबई ४०००१७ असे सांगून, त्याने त्याचे मोबाईल मध्ये VSS कंपनीने दिलेले स्वत:चे आय कार्ड दाखविले. आरोपी येमुदास दुराईस्वामी हरिजन ऊर्फ अण्णा यास मुंबई पोलीस माहिम वाहतूक विभागामार्फत टोईंग करण्यात आलेले तक्रारदार राशिद खान यांची मोटार सायकल क्र. एम-एच-०३-बीजी-५२४४ ही लाचेची रक्कम स्विकारून सोडल्याबाबत विचारणा केली असता, त्याने सांगितले की, तो VSS Multiventures Pvt Ltd या कंपनीचा कर्मचारी असून हेल्पर म्हणून काम करतो. त्यांची कंपनी मुंबई पोलीस वाहतूक विभागाची वाहने टोईंग करण्याचे काम करते. नमूद कंपनीकडून त्याला दरमहा पगार मिळतो. आरोपी येमुदास दुराईस्वामी हरिजन काम करत असलेल्या कंपनीबाबत अधिक माहिती मिळणेसाठी VSS Multiventures Pvt Ltd कंपनीचे संचालक श्री.बगाडे व श्री संदेश पोटे यांचेशी मोबाईलवर संपर्क साधून नमूद कंपनीबाबत अधिक विचारणा केली असता, त्यांनी माहिती दिली की, मुंबई हद्दीतील वाहने टोईंग करण्याकरीता VIPL ( Vidarbha Infotech Pvt. Ltd. ) कंपनी आणि मुंबई पोलीस वाहतूक विभाग यांचेमध्ये करारनामा झालेला होता. तसेच VIPL या कंपनीने मुंबई पोलीस वाहतूक विभागातर्फे वाहने टोईंग करण्याकरीता VSS Multiventures Pvt Ltd कंपनीसोबत पोट करारनामा ( Sub Contract) केलेला आहे. मुंबई हद्दीतील वाहने टोईंग करण्याच्या अनुषंगाने VIPL कंपनीला करारानुसार रक्कम प्राप्त होते. तसेच VIPL कंपनीकडून VSS कंपनीला त्यांच्यामधील करारानुसार रक्कम प्राप्त होते. सदर रक्कमेतून VSS Multiventures Pvt Ltd या कंपनीचे कर्मचारी यांना वेतन देण्यात येते,

अशी माहिती कंपनीचे संचालकांनी दिली. एकंदरीत आरोपी येसुदास दुरईस्वामी हरिजन हा शासनाचे वतीने काम करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम २ (xii) नुसार आरोपी येसुदास दुरईस्वामी हरिजन ऊर्फ अण्णा, वय ४० वर्षे हे लोकसेवक असल्याची खात्री झाली आहे.

मी, कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक येसुदास हरिजन यांस दोन्ही पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी लाचेची रक्कम परिधान केलेल्या चॉकलेटी रंगाच्या पँटच्या डाव्या खिशामध्ये ठेवली असल्याचे सांगितले. माझे सांगणेवरून सदर लाचेची रक्कम ही पंच क्र. २ श्री. गवई यांनी आरोपी लोकसेवकाच्या पँटच्या खिशातून काढून त्याची पाहणी केली असता, रूपये ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ६ नोटा, असे एकुण रूपये ३०००/- असल्याचे त्यांनी सांगितले. सदर लाचेच्या रकमेतील नोटांचे नंबर व झेरॉक्स काढलेल्या कागदावरील सिरियल क्रमांक तंतोतंत मिळून आले.

त्यानंतर मी व सपोआ पावले यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माहिम ट्रॅफिक पोलीस चौकी मधील एका कक्षामधील लाईट्स् बंद करून कृत्रीम अंधार तयार करून पंचांसमक्ष मी, पथकातील अंमलदार यांच्या मदतीने अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक येसुदास हरिजन यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयांची तपासणी केली असता, लोकसेवक येसुदास हरिजन यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना, तळहातास व लोकसेवक यांनी परिधान केलेल्या चॉकलेटी रंगाच्या पँन्टच्या डाव्या खिशाला फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर माझ्या सूचनेनुसार तक्रारदार यांना कक्षात बोलावुन कृत्रीम अंधार तयार करून अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या सहाय्याने तक्रारदार यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयांची तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या उजव्या हाताच्या बोटांना व तळहातास तसेच शर्टच्या खिशाला फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच जप्त करण्यात आलेल्या लाचेच्या रकमेची पाहणी केली असता, लाचेच्या नोटांवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लाईट्स् पूर्ववत करण्यात आले.

त्यानंतर लोकसेवक येसुदास हरिजन यांना ताब्यात घेवुन लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी तक्रारदार राशिद अकबरअली खान हे वापरत असलेली मोटर सायकल क्रमांक एम-एच-०३-बीजी-५२४४ ही दिनांक २१/९/२०२६ रोजी माहिम वाहतुक पोलीस विभागाकडून नो पार्कींग मध्ये उभी असल्याने टोईंग करण्यात आली होती. सदर मोटर सायकल सोडविण्यासाठी माहिम वाहतुक पोलीस विभाग येथे कार्यरत असलेले VSS Multiventures Pvt Ltd या कपंनीचे कर्मचारी लोकसेवक येसुदास दुरईस्वामी हरिजन ऊर्फ अण्णा, वय ४० वर्षे, धंदा - हेल्पर यांनी पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे रू. ३०००/- लाच रक्कमेची मागणी केली व सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांची मोटर सायकल दंड रक्कम वसुल न करता विनापावती सोडून रू. ३०००/- लाच रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन माझी लोकसेवक येसुदास दुरईस्वामी हरिजन ऊर्फ अण्णा यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( उमा गवळी)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंध विभाग, मुंबई.

दारा / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ विना विलंब – पडताळणी क्र. ६६/२०२६ करुन

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page. ..............................

..............................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीखेस वेळी व ठिकाणी तक्रारदार शाहिद अकबरअली खान वापरत असलेली मो/सायकल क्र. MH-03-BG-5244 ही दिनांक २३/०९/२६ रोजी माहिम वाहतुक पोलीस विभागाकडुन नो पार्किंगमध्ये उभी असल्याने टोईंग करण्यात आली होती. सदर मो/सायकल सोडविण्यासाठी माहिम वाहतुक विभाग मध्ये कार्यरत असलेले VSS Multiventures Pvt Ltd या कंपनीचे कर्मचारी लोकसेवक येसुदास दुरईस्वामी हरिजन उर्फ अण्णा वय ४० वर्षे याने पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे रु. ३,०००/- रकमेची मागणी करून सदरची मो/सायकल विनापावती सोडून रु. ३,०००/- रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........ स.पो.आ. उमा गवळी.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ – ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..............................

(3) Transferred to P. S. ..............................
District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant
[signature] 24/09/26

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge Police Station [signature]

संपूर्ण नाव Name ........ उमा गवळी ........

पदनाम Rank ........ सहाय्यक पोलीस आयुक्त, ........

तपासिक अ. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Posting

Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........ २४/०९/२०२६ ........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report